सर्व देण्याची सर्व जबाबदारी लिहून देणार/विक्रेता ची राहील. जर ते लिहून घेणार/खरेदीदार ला भरावे लागल्यास, ती रक्कम लिहून देणार/विक्रेता कडून वसूल करण्याचा अधिकार लिहून घेणार/खरेदीदार ला राहील. विक्रीपत्राचे दिवसानंतरचे काळाकरीता आकारण्यात मागण्यात येतील अशी सर्व देणी, टॅक्सेस वगैरे परस्पर भरण्याची जबाबदारी लिहून घेणार/खरेदीदार ची राहील.

(११) माझ्या मालकी हक्काच्या कमीपणामुळे सदर दोन्ही स्थावर मालमत्ता अथवा त्यांचा कोणताही भाग तुमच्या ताब्यातून निघाल्यास व त्यापासून तुमचे काही नूकसान झाल्यास ते सर्व मी मयखर्चासह बिनाऊजर तुम्हाला भरुन देऊ त्याबद्दल कसलाही उजर करणार नाही. तसेच तुमच्या मालकी ताब्यासंबंधी मी किंवा माझे वारस कसलाही प्रकारचा उजर अथवा दावा करणार नाही व तसा काही केल्यास तो या लेखाने रद्द समजण्यात यावा.

(१२) सदरहु दोन्ही स्थावर मालमत्ता विकत घेतल्यानंतर लिहून घेणार/खरीददार यांनी सर्व संबंधीत सरकारी रेकार्डमध्ये माझे नांव खारीज करुन आपले नांव स्वखर्चाने दर्ज करून घ्यावे, त्यासंबंधी सर्व आवश्यक कायदेशीर सहकार्य करण्याचे लिहून देणार/विक्रेता कबुल व मान्य करतात.

(१३) या दोन्ही शेतजमिनीचा रिकामा ताबा (Vacant Possession) मी तुम्हांस आज रोजी दिला आहे. तुमच्या मालकी ताब्यासंबंधी मी किंवा माझे वारस कसलाही उजर करणार नाही. सदर दोन्ही स्थावर मालमत्तेवर आकारण्यात येणारा लॅन्ड रेव्हेन्यु व सेसेस मी म्हणजे लिहून देणार/विक्रेता यांनी आजपावेतोचे दिलेले आहेत. तसेच सदर दोन्ही स्थावर मालमत्तेवर मी कसल्याही प्रकारचा बोझा निर्माण केलेला नाही. सदर मोबदल्यात लिहून घेणार/खरेदीदार यांना आश्वासन देतात की, या दस्ताद्वारे विकलेल्या दोन्ही शेतजमीनी लिहून देणार/विक्रेता ने लिहून घेणार/खरेदीदार ला मालकी हक्काने व पूर्ण हिस्स्याचे, मालकी निस्तार व वहीवाटीचे सर्व हक्कासहीत विकत दिलेली आहे.

(१४) आता यापुढे लिहून घेणार/खरेदीदार सदरहु दोन्ही शेतजमीनींचे पूर्णपणे मालक झालेले आहेत. यापुढे सदर दोन्ही मिळकतींची नेहमीकरीती मालकी, वहीवाट व फायदा उपभोगण्याचा अगर मर्जीनुसार विल्हेवाट लावण्याचा पूर्ण अधिकार/हक्क लिहून घेणार/खरेदीदार ला आहे. यापुढे लिहून घेणार/खरेदीदार चे ताब्यास, मालकीस व वहीवाटीस लिहून देणार/विक्रेता अथवा त्यांचे इस्टेट वारस/गोत्रज/कायदेशीर हक्कदार यांची काहीच हरकत आक्षेप, अधिकार व अडथळा राहणार नाही.

(१५) संमतीदार असे लिहून देत आहेत की सदरहू संपत्तीत वारसान हक्काने माझे हितसंबंध तसेच हक्क असुन तसेच उपरोक्त लिहून देणार/विक्रेता हे लिहून घेणार/खरेदीदार यांना वर नमुद विक्री मोबदल्यात विकत असुन या सौदयाला माझी पूर्ण संमती असल्याने मला कोणत्याही कायदया अंतर्गत प्राप्त असलेले सर्व अधिकार, हक्क लिहून घेणार/खरेदीदार यांच्या हक्कात या लेखाद्वारे हमेशाकरीता विसर्जीत करून तब्दील/हस्तांतरीत करीत आहोत सबब भविष्यात त्याबाबत माझा कोणत्याच प्रकारचा उजर

पुढील पानांवर .....

हगन
११६८ / २०१९
११ / ३२

Scanned with CamScanner

अथवा दावा राहणार नाही तसेच माझे वाली वारस कसलाही प्रकारचा उजर अथवा दावा करणार नाही.

(१६) या दस्ताचे नोंदणी करीता आवश्यक तो मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, वकील खर्च इत्यादी खर्च लिहून घेणार/खरेदीदार यांनी केलेला आहे.

:: परिशिष्ट ::
या दस्ताऐवजाद्वारे विकलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन

खास तुकडी – कोतेवाडा, तहसिल – हिंगणा, जिल्हा – नागपूर, पंचायत समिती हिंगणा, जिल्हा परिषद नागपूर तसेच सबरजिस्ट्रार हिंगणा यांच्या हद्दीतील **मौजा – कोतेवाडा**, तलाठी साझा क्र. ७२ येथील शेतजमीन जीचा **भूमापन/खसरा/गट क्रमांक १५३/१ व १६१/१**, दोन्ही भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग १, अनुक्रमे **आराजी ३.१६ हेक्टर आर व आराजी १.२५ हेक्टर आर**, अनुक्रमे जमा रू. ७ वार्षीक व रू. ४.८१ वार्षीक, खाते क्र. २० हिस्सापुर्ण शेतजमीनी तसेच त्यावरील सर्व प्रकारची झाडझुडपे, मय, तृण, काष्ट, पाषाण, तसेच इतर सर्व मालकी अधिकारांसह शेतजमीनी, ज्या गांव कोतेवाडा, तहसील – हिंगणा व जिल्हा – नागपूर येथे स्थित आहे व यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे–

भुमापन/खसरा/गट नं. १५३/१ ची चतु:सिमा –

पूर्वेस	:	नाला,
पश्चिमेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १४३ व १६१/१,
उत्तरेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १५२,
दक्षिणेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १५३/२.

भुमापन/खसरा/गट नं. १६१/१ ची चतु:सिमा –

पूर्वेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १५३/१ व १५३/२,
पश्चिमेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १६२ व १६३,
उत्तरेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १४३,
दक्षिणेस	:	भुमापन/गट/खसरा क्र. १६१/२.

करीता या विक्रीपत्रावर लिहून देणार/विक्रेता, लिहून घेणार/खरेदीदार आणि लिहून देणार/संमतीदार, यांनी ते पूर्णपणे वाचून समजून उमजून, कुठल्याही दबावाला बळी न पडता स्वखुषीने आज दिनांक २१.. फेब्रुवारी, २०१९ रोजी हिंगणा येथील नोंदणी कार्यालयांत त्यावर साक्षदारांसमोर स्वाक्षरी केली आहे.

पुढील पानांवर .....

हगन
996C / २०१९
१२ / ३२

THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II

Scanned with CamScanner